|| श्री गणेशाय नमः ||

Astro • Puja • Vastu

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार


योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 95944 28749

निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 86524 02078

# श्रीवरदशंकर व्रतकथा आणि पूजाविधी

## शिवअष्टोत्तर नामावली व शिवपञ्चाक्षरस्तोत्रासह

लेखक व संपादक : दि. अ. घैसास



धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई

सौ. विद्या कुंडलिक अधाटे कडून
सप्रेमभेट ९३२०१३३८८८
श्री. योगेश दळवी
यांस

# श्रीवरदशंकर पूजा व व्रतकथा

(शिवअष्टोत्तरनामावली व शिवपञ्चाक्षरस्तोत्रासह)

लेखक व संपादक : दि. अ. घैसास

**किंमत : २० रूपये**


**धार्मिक प्रकाशन संस्था**

१७३ एफ, गिरगाव मार्ग, मुंबई-४०० ००४. ✻ ☎ २३८६६१५१

**प्रकाशक :**
धार्मिक प्रकाशन संस्था
१७३ एफ, गिरगाव रोड,
मुंबई - ४०० ००४.

**अक्षरजुळणी :**
अक्षय फोटोटाइपसेटर्स
१-चित्रकूट सहनिवास,
डॉ. आंबेडकर मार्ग, ठाणे- १

**श्रीवरदशंकर पूजा व व्रतकथा**
**नवीन आवृत्ती :-२०१२**

**मुद्रक :**
पॉप्युलर प्रिंटिंग प्रेस,
धनराज इंडस्ट्रीयल इस्टेट,
गाळा नं. १, लोअर परळ, मुंबई - १३.

**मुखपृष्ठ :**
विकास फडके, ठाणे- १



# वरदशंकरव्रतपूजा

**१) ॐ नमः शिवाय। ॐ नमः शंकराय। ॐ नमः महादेवाय। ॐ नमः हराय। ॐ नमः रुद्राय। ॐ नमः महेश्वराय। ॐ नमः शंभवे। ॐ नमः ईश्वराय। ॐ नमः नंदीश्वराय। ॐ नमः महालिंगाय। ॐ नमः पशुपतये। ॐ नमः उमापतये। ॐ नमः सदाशिवाय। ॐ नमः मल्लिकार्जुनाय।**

**प्रसाद** - गव्हाचे पीठ, तूप, साखर अथवा गूळ, दूध यांचा करावा.

**पूजेचे साहित्य** - समई, निरांजन, कापूरआरती, उदबत्तीची सोंगटी. चौरंग, पांढरे वस्त्र, भस्म (विभूती), चंदन (गंध) निवडलेले तांदूळ, बिल्वपत्र, (१०८, १००८) पंचामृत (दही, दूध, तूप, मध, साखर एकत्र केलेले), केळी, फळे, श्रीफळ (नारळ), यज्ञोपवीत, शिवलिंग, रुद्राक्षमाला, दुर्वा, नंदी, शंख, घंटी, हळद, कुंकू, गुलाल, अक्षता, रांगोळी, पांढरी फुले (प्रामुख्याने), नाना प्रकारची फुले, पुष्पमाला, देवाचा फोटो, उदबत्ती, कापूर, कापसाच्या वाती, तूप, आगपेटी, समईसाठी तेल, विड्याची पाने २५, खारीक, खोबरे, बदाम, सुपाऱ्या, आंब्याची पाने, मखरासाठी

केळीचे अथवा कर्दळीचे खुंट, गूळ, शंकराचा फोटो, गहू, तांदूळ, दक्षिणा, तांब्याचा किंवा पितळेचा तांब्या, त्यावर ठेवायचे ताम्हन.

ज्या दिवशी वरदशंकर (सत्यशंकर) पूजेचा संकल्प केला असेल त्या दिवशी प्रदोषकाळी (सूर्यास्ताच्या वेळी) अथवा इष्ट काळी शुचिर्भूत होऊन शुभ्र धूतवस्त्र अथवा सोवळे नेसावे. रुद्राक्षमाला, भस्मधारण, यज्ञोपवीत अथवा लिंग धारण करून वरदशंकराचे पूजेस बसावे. पूजकाचे तोंड पूर्वेकडे व देवाचे पश्चिमाभिमुख असावे. केळीचे खांब अथवा कर्दळी व लता पत्रांनी सुशोभित चौरंग ठेवून सभोवती रांगोळी काढावी. घरचे देवांना, वडीलमंडळीस व पूजा सांगणाऱ्या उपाध्यायास नमस्कार करावा व पूजेस सुरुवात करावी. समई प्रज्वलित करावी, निरांजन, उदबत्ती लावावी. चौरंगावर पांढरे नवे वस्त्र अंथरून त्यावर तांदूळ पसरून वर पाण्याने भरलेला कलश ठेवावा. कलशाचे पायथ्याशी अग्रभागी गणपतीची सुपारी मांडावी, कलशामध्ये पाच विड्याची पाने कमानाकृती ठेवावी. कलशावर ठेवण्यासाठी एक छोटे ताम्हन (पूर्ण पात्र) घ्यावे. पूजा करणाऱ्याने पाण्याने भरलेला तांब्या, फुलपात्र, पळी, रिकामे ताम्हन समोर घ्यावे. आचमन करून, भस्मधारण करावे. प्राणायाम करावा, देवाला हात जोडावे. ॐ श्री गणेशाय नमः, ''ॐ शिवाय नमः, शंकराय नमः,



महादेवाय नमः, हराय नमः, सहाय नमः, महेश्वराय नमः, महालिंगाय नमः, पशुपतये नमः, उमापतये नमः। सदाशिवाय नमः। मल्लिकार्जुनाय नमः ही अकरा नावे घेऊन मन पूजनामध्ये एकाग्र करावे.

हातात थोड्या अक्षता व पळीभर पाणी घेऊन संकल्प म्हणावा -

**मम आत्मनः श्रुति स्मृति पुराणोक्तफल प्राप्त्यर्थं मनोप्सित सकल मनोरथ सिद्ध्यर्थं च श्री वरदशंकरदेवतापूजनं, कथाश्रवणं च करिष्ये। तत्रादौ श्रीगणपतिपूजनं, कलशस्थापनं पूजनं च, वरुण देवता, नंदी देवता पूजनं च करिष्ये।** (हातातले संकल्पाचे पाणी ताम्हनात सोडावे.)

श्री महागणपतये नमः असे म्हणून गणपतीची पाणी, पंचामृत, गंध, अक्षता, पुष्प, दुर्वा, सिंदूर, अष्टगंध, हळद, कुंकू, गुलाल यांनी पूजा करावी. उदबत्ती ओवाळावी. विड्याचे पानावर गूळ, खोबरे, खारीक, बदाम, सुपारी आदि खाद्य ठेवून नैवेद्य दाखवावा. दक्षिणा ठेवावी. आरती ओवाळून खडीसाखर, मंत्राक्षता वाहाव्या. हात जोडून ''वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ निर्विघ्नं कुरु मे देव सर्वकार्येषु सर्वदा'' अशी प्रार्थना करावी.

चौरंगावरील कलशात विभूती, गंध, अक्षता, पुष्प, सुपारी, १ नाणे टाकून त्यावर ज्यात तांदूळ भरले आहेत असे पूर्णपात्र म्हणजेच ताम्हन ठेवावे. ताम्हनात सुपारी ठेवावी व वरुणाय नमः या मंत्राने वरुणाचे आवाहन करून पूजा करावी. शंख व घंटेची पूजा करावी.

श्री नंदिकेश्वराय नमः असे म्हणून नंदीची पाणी, पंचामृत, विभूती, गंध, अक्षता, पुष्प यांनी पूजा करून विड्याचे पानावर खाद्य (गूळ खोबरे इ.) ठेवून नैवेद्य दाखवावा. दक्षिणा ठेवून आरती ओवाळून मंत्राक्षता वहाव्यात. नंदीसहित शिवलिंग पूजेस ताम्हनात घ्यावे. शाळुंका शिवलिंग नंदी न मिळाल्यास केवळ शिवलिंग घ्यावे. तेही न मिळाल्यास श्रीफळाची स्थापना करावी, शंकराचा फोटो पुजावा. हात जोडून वरद शंकराचे ध्यान करावे.

**ध्यायेन्नित्यं महेशं रजतगिरिनिभं चारुचंद्रावतंसं। रत्नाकल्पोज्ज्वलांगं परशुमृगवराभीतिहस्तं प्रसन्नम्। पद्मासीनं समंतात् स्तुतममरगणैर्व्याघ्रकृत्तिं वसानं। विश्वाद्यं विश्ववंद्यं निखिल - भयहरं पंचवक्त्रं त्रिनेत्रम् ॥१॥** हा श्लोक म्हणून शंकराचे मनोमन ध्यान करावे व त्याला फूल व बेलाचे पान वाहावे.

**ॐ वरदशंकराय नमः। आवाहनं समर्पयामि।** (पुष्प, बेल)
**ॐ वरदशंकराय नमः। आसनं समर्पयामि।** (अक्षता, बेल)
**ॐ वरदशंकराय नमः। पाद्यं समर्पयामि।** (पाणी)
**ॐ वरदशंकराय नमः। अर्घ्यं समर्पयामि।** (गंध, अक्षता, पाणी)
**ॐ वरदशंकराय नमः। स्नानं समर्पयामि।** (पूर्ण स्नान पाण्याने)




**ॐ वरदशंकराय नमः। पंचामृतस्नानं समर्पयामि।** (दही, दूध, तूप, मध, साखर यांनी स्नान)
**ॐ वरदशंकराय नमः। शुद्धोदक स्नानं समर्पयामि।** (पूर्ण स्नान घालावे.)
**ॐ वरदशंकराय नमः। गंधाक्षतान् पुष्पं बिल्वपत्रं च समर्पयामि।** (देंवाला गंध, अक्षता, पुष्प व बेलाचे पान वहावे)
**ॐ वरदशंकराय नमः। धूपं दीपं दर्शयामि।** (उदबत्ती व निरांजन ओवाळावे)
**ॐ वरदशंकराय नमः। पंचामृतशेष नैवेद्यं समर्पयामि।** (पंचामृताचा नैवेद्य दाखवावा.)
**ॐ वरदशंकराय नमः। मंत्रपुष्पं समर्पयामि नमस्करोमि।** (अक्षता पुष्प वाहून नमस्कार करावा.)
**उत्तरे निर्माल्यं विसृज्य अभिषेकं कुर्यात्** (देवावर वाहिलेली फुले काढून बाजूस ठेवावी आणि अभिषेक करावा.

शिवमहिम्नाने अथवा रुद्राध्याय म्हणून देवावर अभिषेक करावा. अभिषेक झाल्यानंतर देव स्वच्छ पुसून अत्तर लावावे. विभूतिभस्म लावावे. वरदशंकरांची कलशावरील ताम्हनात (पूर्णपात्रात) स्थापना करावी.

**ॐ वरदशंकराय नमः। वस्त्रं समर्पयामि।** (शुभ्र कापासाची वस्त्रे)
**ॐ वरदशंकराय नमः। यज्ञोपवीतं समर्पयामि।** (जानवे वहावे)
**ॐ वरदशंकराय नमः। चन्दनं समर्पयामि।** (गंध, चंदन)
**ॐ वरदशंकराय नमः। अक्षतान् समर्पयामि।** (अक्षता)
**ॐ वरदशंकराय नमः। पुष्पाणि/पुष्पमालाः समर्पयामि।** (पांढरी फुले व फुलांची माळ)
**ॐ वरदशंकराय नमः। बिल्वपत्रं समर्पयामि।** (त्रिदलबिल्व पत्रे १०८ अथवा शक्य तेवढी वाहावी, खाली दिलेल्या शिवनामावलीतील नामे म्हणावी) -

अद्येतादि० संकल्प म्हणून त्यानंतर बेलपत्रे वहाताना पुढीलप्रमाणे संकल्प म्हणावा -

मम ईप्सितकामनासिद्ध्यर्थं श्रीवरदशंकरप्रीत्यर्थं तस्य दिव्य अष्टोत्तरशतनामभिः अष्टोत्तरशतसंख्याकं बिल्वपत्रसमर्पणम् अहं करिष्ये। असे म्हणून "ध्यायेन्नित्यं० हा पूर्वोक्त शिवध्यानमंत्र म्हणावा आणि एकेका नामाचा उच्चार करून पिंडीवर किंवा तसबिरीपुढे बेलाची त्रिदले वहावीत.



## श्रीशिवाष्टोत्तरशतनामानि

१. शिवाय नमः २. महेश्वराय नमः ३. शंभवे नमः ४. पिनाकिने नमः ५. शशिशेखराय नमः ६. वामदेवाय नमः ७. विरूपाक्षाय नमः ८. कपर्दिने नमः ९. नीललोहिताय नमः १०. शंकराय नमः ११. शूलपाणये नमः १२. खट्वांगिने नमः १३. विष्णुवल्लभाय नमः १४. शिपिविष्टाय नमः १५. अंबिकानाथाय नमः १६. श्रीकंठाय नमः १७. भक्तवत्सलाय नमः १८. भवाय नमः १९. शर्वाय नमः २०. त्रिलोकेशाय नमः २१. शितिकंठाय नमः २२. शिवाप्रियाय नमः २३. उग्राय नमः २४. कपर्दिने नमः २५. कामारये नमः २६. अंधकासुरसूदनाय नमः २७. गंगाधराय नमः २८. ललाटाक्षाय नमः २९. कालकालाय नमः ३०. कृपानिधये नमः ३१. भीमाय नमः ३२. परशुहस्ताय नमः ३३. मृगपाणये नमः ३४. जटाधराय नमः ३५. कैलासवासिने नमः ३६. कवचिने नमः ३७. कठोराय नमः ३८. त्रिपुरांतकाय नमः ३९. वृषांकाय नमः ४०. वृषभारूढाय नमः ४१. भस्मोद्धूलितविग्रहाय नमः ४२. सामप्रियाय नमः ४३. स्वरमयाय नमः ४४. त्रयीमूर्तये नमः ४५. अनीश्वराय नमः ४६. सर्वज्ञाय नमः ४७. परमात्मने नमः ४८. सोमसूर्याग्निलोचनाय नमः ४९. हविषे नमः ५०. यज्ञमयाय नमः ५१. सोमाय नमः ५२. पंचवक्त्राय नमः ५३. सदाशिवाय नमः

५४. विश्वेश्वराय नमः ५५. वीरभद्राय नमः ५६. गणनाथाय नमः ५७. प्रजापतये नमः
५८. हिरण्यरेतसे नमः ५९. दुर्धर्षाय नमः ६०. गिरीशाय नमः ६१. गिरिशाय नमः
६२. अनघाय नमः ६३. भुजंगभूषणाय नमः ६४. भर्गाय नमः ६५. गिरिधन्वने नमः
६६. गिरिप्रियाय नमः ६७. कृत्तिवाससे नमः ६८. पुरारातये नमः ६९. भगवते नमः
७०. प्रथमाधिपाय नमः ७१. मृत्युंजयाय नमः ७२. सूक्ष्मतनवे नमः ७३. जगद्व्यापिने नमः
७४. जगद्गुरवे नमः ७५. व्योमकेशाय नमः ७६. महासेनजनकाय नमः ७७. चारुविक्रमाय
नमः ७८. रुद्राय नमः ७९. भूतपतये नमः ८०. स्थाणवे नमः ८१. अहिर्बुध्न्याय नमः
८२. दिगंबराय नमः ८३. अष्टमूर्तये नमः ८४. अनेकात्मने नमः ८५. सात्त्विकाय नमः
८६. शुद्धविग्रहाय नमः ८७. शाश्वताय नमः ८८. खंडपरशवे नमः ८९. अजाय नमः
९०. पाशविमोचनाय नमः ९१. मृडाय नमः ९२. पशुपतये नमः ९३. देवाय नमः
९४. महादेवाय नमः ९५. अव्ययाय नमः ९६. हरये नमः ९७. पूषदंतभिदे नमः ९८. अव्यग्राय
नमः ९९. दक्षाध्वरहराय नमः १००. हराय नमः १०१. भगनेत्रभिदे नमः १०२. अव्यक्ताय नमः
१०३. सहस्राक्षाय नमः १०४. सहस्रपदे नमः १०५. अपवर्गप्रदाय नमः १०६. अनंताय नमः
१०७. तारकाय नमः १०८. परमेश्वराय नमः ॥



याप्रमाणे बिल्वपत्रे वाहून झाल्यावर **अनेनाष्टोत्तरशतसंख्याकबिल्वपत्र समर्पणेन भगवान् वरदशंकरः प्रीयताम्** ॥ असे म्हणून हात जोडावे.

**ॐ वरदशंकराय नमः। धूपं समर्पयामि।** (उदबत्ती, धूप)

**ॐ वरदशंकराय नमः। दीपं समर्पयामि।** (निरांजन ओवाळावे.)

**ॐ वरदशंकराय नमः। नैवेद्यं समर्पयामि।** (प्रसादाचा नैवेद्य)

**ॐ वरदशंकराय नमः। तांबूलं समर्पयामि।** (विड्याची पाने, सुपारी, खारीक, खोबरे, बदाम, खडीसाखर)

**ॐ वरदशंकराय नमः। श्रीफलं समर्पयामि।** (नारळ)

**ॐ वरदशंकराय नमः। फलानि समर्पयामि।** (फळे)

**ॐ वरदशंकराय नमः। दक्षिणां समर्पयामि।** (दक्षिणेची रक्कम)

**ॐ वरदशंकराय नमः। निरांजनं समर्पयामि।** (आरती ओवाळणे)

**ॐ वरदशंकराय नमः। कर्पूरारतिं समर्पयामि।** (कापूराची आरती)

**ॐ वरदशंकराय नमः। मंत्रपुष्पं समर्पयामि।** (अक्षता, पुष्प, बेल)

**ॐ वरदशंकराय नमः। नमस्कारं करोमि।** (हात जोडावे)

"ध्यायेन्नित्यं० हा पूर्वोक्त श्लोक म्हणून प्रार्थना करावी.

वरदशंकर व्रताचे पोथीस नमस्कार करावा. कथा वाचणाऱ्यास विभूतिभस्म, गंध लावून फुलांची माळ घालावी. वरदशंकराची कथा एकाग्र मनाने व श्रद्धेने श्रवण करावी. कथा संपल्यानंतर उत्तर पूजा करावी. अन्नाचा महानैवेद्य दाखवावा. आरती मंत्रपुष्पांजली करावी. उपाध्यायाची (पुरोहित, स्वामी अथवा पूजा कथा सांगणाऱ्यांची) पूजा करावी व दक्षिणा द्यावी. सर्वांनी तीर्थ प्रसाद घ्यावा. भोजन करावे. पवित्र आचरण असावे - सत्य भाषण करावे. रात्री भजन-कीर्तनादि करावे.

**ॐ नमः पार्वतीपते हरहर महादेव॥**

**॥ इति संक्षिप्त श्री वरदशंकर पूजा॥**




# शिवगायत्री मंत्र

**॥ तत्पुरुषाय विद्महे महादेवाय धीमहि तन्नो रुद्रः प्रचोदयात्॥**

**॥ वन्दे शैलसुतापतिं सुरगुरुं वन्दे जगत्कारणम्।**

**॥ वन्दे पन्नगभूषणं मृगधरं वन्दे पशूनां पतिम्॥**

**॥ वन्दे सूर्यशशाङ्कवन्हिनयनं वन्दे मुकुंदप्रियं।**

**॥ वन्दे भक्तजनार्दनादरपरम् वन्दे शिवम् शंकरम् ॥ १॥**

हे व्रत पौर्णिमेस सूर्य संक्रांतीस, सोमवारी तसेच शिवरात्री उपवासाचे दुसरे दिवशी उपवासाची सांगता करताना अवश्य करावे. ह्या व्रताच्या पोथीच्या अकरा प्रती अथवा पाच प्रती शिवभक्तांना वाटाव्या. हे व्रत कलियुगात विशेष फल देणारे असून भक्ताच्या मनोकामना पूर्ण करून भक्तिमार्गाने शिवाचे सायुज्यपद प्राप्त करून देणारे आहे.

श्री वरदशंकर पूजा

# ॥ अथ श्रीवरदशंकर व्रतमाहात्म्य ॥

## ॥ अध्याय पहिला ॥

श्री गणेशासी असो वंदन। श्री सरस्वतीसी असो वंदन। श्री गुरुसी असो वंदन। वंदन मात्यापित्याते ॥१॥ श्री पार्वतीपरमेश्वराते। वंदन जगताचिया पितरांते। वंदन सर्व देवतांते। श्री वरदशंकरा ॥२॥ स्वस्तिश्री व्यास महर्षी। वंदनीय जे सर्व मनीषी। जगताचे हितैषी। सिद्ध पुरुष संतही ॥३॥ श्री वरदशंकराचे व्रत। आता पुराणगत वर्णीत। शौनकादि ऋषींसी सूत। नैमिषारण्यी सांगती ॥४॥ भविष्योत्तर पुराणांतरी। कथा महिमा असे खरी। मराठी ओवीमाजी सारी। सुबोध करूनी वर्णितो ॥५॥





वरदव्रताचिया दिनी। श्रीशिवपूजा अवसानी। हे माहात्म्य वाचुनी। श्रवण करावे अगत्ये ॥६॥ असो कथाप्रसंग पुराण। शौनक विचारती प्रश्न। सूत तेधवा करिती कथन। श्रवण करिती संतजन ॥७॥ शौनक म्हणती हे सूता। प्रज्ञावंता ज्ञानवंता। कलियुगाचाही धर्म जाणता। तू अससी सर्वज्ञ ॥८॥ कलियुगी अल्पशक्तीचे। जन होतील अल्पमतीचे। डोंगर पडतील संकटाचे। दुःखे नाना येतील ॥९॥ तरी त्यांचिया मोचनासाठी। सकलही कल्याणासाठी। व्रत सांगावे ज्याने कष्टी। नच राहती व्रतस्थ ॥१०॥ स्वल्पायासे महाफल। जे आचरिता मिळेल। ऐसे सोपे व्रत कृपाळ। तुवा सांगावे सर्वांना ॥११॥ सूत म्हणती साधु विचारणा। आता करितो मी कथना। जेणे जनांच्या संसारयातना। दूर होतील कलियुगी

॥१२॥ पुरातन असे आख्यान। क्रौंच पर्वतावरी येऊन। अगस्त्य ऋषी करिती निवसन। काशी सोडुनी गेलेले ॥१३॥ कार्तिकेय जो शिवसुत। महातेजस्वी ज्ञानी गुप्त। तयांसी अगस्त्य भेटत। आर्त मने प्रार्थिती ॥१४॥ हे महाप्रज्ञा कृत्तिकाकुमरा। माझी विनंती श्रवण करा। दुःख माझे दूर सारा। उपाय सांग काही हो ॥१५॥ म्या सोडिले काशीनगर। भागीरथीचे पावन तीर। देवांवरी करावया उपकार। दक्षिणदेशी राहिलो ॥१६॥ देवांचिया कार्यासाठी। सोडिला विश्वनाथ जगजेठी। विरहे यातना मज मोठी। वाटतसे परी अंतरी ॥१७॥ कोठे दूर तो विश्वेश्वर। कोठे दक्षिणेस मी गिरीवर। मन जाहले विरहकातर। पुनर्भेट कधी घडावी ॥१८॥ तुमचिया दर्शनेकरून। दुःख चिंता कमी होऊन। थोडेसे मज




समाधान। वाटतसे सान्निध्ये ॥१९॥ हे षण्मुखा विशाललोचना। मग चिंतेचिया हरण। उपाय मज सांगा ना। केव्हा भेटेन विश्वनाथा ॥२०॥ कार्तिकेय म्हणती मुनिवरा। भेटावया विश्वेश्वरा। आतुर तू असती खरा। धन्य वाटे तव भाग्य ॥२१॥ तव भक्ती सर्व श्रेष्ठ। सांगतो तुजलागी इष्ट। सर्वांचेही त्यात स्पष्ट। हित घडेल अनुषंगे ॥२२॥ ऐसे एक असे व्रत। दुःखनाशक पुण्यप्रद। शिवप्राप्ती जेणे होत। सर्व संकटे नासती ॥२३॥ वरदशंकर पूजाव्रत। असे त्यात सर्वहित। पूर्वी ब्रह्मदेवासी उमानाथ। सांगता झाला व्रतासी ॥२४॥ अगस्त्य म्हणती कोण समयी। शिव हे व्रतज्ञान देई। स्कंद म्हणे ऐक काही। कथा फार प्राचीन ॥२५॥ पूर्वी कल्पारंभी ईश्वर। निजमायेने स्थिरचर। जगताचा करूनी संहार। आत्मरूपी मग्न असे ॥२६॥

श्री वरद शंकर पूजा

प्रलयोदकाच्या सागरात। निजसुखे असता समाधीत। सृष्टी निर्माण
करण्या होत। स्फूर्ती त्याच्या अंतरी ॥२७॥ अहम् स्फुरणातुनी
शक्ती। निघुनी सत्त्वगुणाकृती। महाविष्णू आविर्भवती। प्रथम ते
त्यातुनी ॥२८॥ तो विष्णू शेषशायी असे। सर्वत्र कारणजलार्णव
विलसे। नाभिप्रांती तेथ अनायासे। पूर्ण कमळ निघाले ॥२९॥
त्यात उद्भवला ब्रह्मदेव। दिसे त्याला जलार्णव। मनी म्हणे काय
मद्भाव। कोण मी कोठून मी ॥३०॥ कोण माझा उत्पत्तिकर्ता। काय
कर्तव्य मज आता। सर्वत्र मी येथ पाहता। जल दिसे भरलेले ॥३१॥
ऐसे पाहता कमलाश्रय। दिसे तयाला एक आश्चर्य। विष्णूचिया
ठायी काय। घडतसे अपूर्व ॥३२॥ विष्णु-कर्णमलापासूनी। दोन
दैत्य साकारूनी। ब्रह्मदेवावरी धावुनी। आले मारावयाते ॥३३॥




ब्रह्मदेवासी करिती प्रहार। तेणे तो दुःखित फार। मधु कैटभ नामे
साचार। दैत्य महाबलाढ्य ॥३४॥ जो कल्पांतीही न ढळे।
कल्पारंभीही आढळे। ज्याचे स्थानच विश्वावेगळे। शिव शरण्य त्या
वाटे ॥३५॥ म्हणुनी विधाता शिवासी। शरण गेला त्वरेसी। म्हणे
मज वाचवी त्रासीं। फार पडलो दैत्यांच्या ॥३६॥ धीर नाही आता
उरला। दैत्य भक्षू पाहती मजला। मी तुजवीण कोणाला। शरण जाऊ
शंकरा ॥३७॥ तूच त्रिलोकींचा त्राता। तूच सकलांची पीडा हर्ता।
मजसठी सत्वर आता। रक्षणकार्य करावे ॥३८॥ स्तवन करी ब्रह्मा
जधी। आकाशवाणी प्रगटे तधी। शिवशंकर सोडुनी समाधी। काय
बोले विधात्या ॥३९॥ वरद नामे माझे स्वरूप। पूजन व्रत करी
निष्पाप। संकट टळेल आपोआप। दुःख दूर होईल ॥४०॥

आकाशवाणी करूनी श्रवण। ब्रह्मदेवे करीं जल घेऊन। संकल्पाचे बोलिले वचन। व्रत करीन निश्चये ॥४१॥ संकल्प करिता काय झाले। विष्णूचिया ठायी आले। जागृत चैतन्य त्या काले। योगनिद्रा त्या सोडी ॥४२॥ योगनिद्रेने देह सोडिता। विष्णु जागृतही होता। पाहतसे जो विधाता। दैत्य पीडित अत्यंत ॥४३॥ तेणे विष्णु मनी द्रवला। युद्धासाठी स्वये उठला। मधुकैटभ सोडुनी विधात्याला। विष्णुवरी धावले ॥४४॥ विष्णु दोघां दैत्यासंगे। खेळे द्वंद्वयुद्ध अंगे। सूत शौनकासी सांगे। नैमिषारण्यीं ती कथा ॥४५॥ युद्ध पाच सहस्र वर्षे। चालले दोघांशी अति रोषे। विष्णू निरुपाये निराशे। पळुनिया चालला ॥४६॥ दैत्य म्हणती काय भियाला। पळुनिया कोठे चालला। पराक्रम दाखवी आम्हाला। हसताती यापरी ॥४७॥



जलार्णवीं विष्णू लपला। शत वर्षे नाही सापडला। दैत्यानी जरि बहु शोधिला। गुप्त नच गवसे तो ॥४८॥ दैत्यभय दूर करावयास। विष्णू आराधी शंकरास। म्हणे नमस्कार माझा तयास। पालनकर्ता जो जगा ॥४९॥ जो भक्त जनांसी तारण। जो शरणजन - संरक्षण। त्या शंभूसी माझे नमन। जगदाधारा शंकरा ॥५०॥ जगदुत्पत्ती स्थितीगती। कलिकाळाची घालवी भीती। नमन तुजला कैलासपती। श्रुतिबोध्य तत्त्व तू ॥५१॥ तू सर्वांहूनी निजांतरीं। राहसी सर्वहृदयगव्हरीं। सकलस्वरूपी तू संसारीं। दुःखहारी मलहारी ॥५२॥ सकलरूपा निजरूपा। त्रिभुवनरूपा अमापा। नित्य साधुचित्तसमीपा। निष्पापा निर्गुणा ॥५३॥ ऐशी स्तुती करिता देव। प्रगट जाहला महादेव। अनंत रूपे अनंत भाव। प्रगट आणि

अदृश्य ॥५४॥ विष्णूसी घडता दर्शन। फिरुनिया करी स्तवन। तू कारुण्यसिंधू भयहरण। नीलकंठा सर्वज्ञा ॥५५॥ शंभो धूर्जटी दीननाथा। उमानाथा कैलासनाथ। वाचवी मज आता समर्था। दोन दैत्य पीडती ॥५६॥ माझिया योगिनिद्रेकाळीं। यांची उत्पत्ती कर्ण-मळीं। उपजतांच जलार्णवीं बळी। ब्रह्मदेवा छळियले ॥५७॥ तव व्रताने मी जागृत। मजपाशी झुंजती हे दैत्य। रक्षण माझे करी अगत्य। शरणागतवत्सला ॥५८॥ शिव म्हणे विष्णूला। जो उद्यम स्वये केला। दैवी पाठबळ नसता त्याला। व्यर्थ तो जातसे ॥५९॥ स्वबळावरी विसंबुनी। केला जरी प्रयत्न जनी। निष्फळ देवसाह्यावाचुनी। क्लेश मात्र होताती ॥६०॥ दैवी साह्य मिळे पूर्व। कर्म पुण्यकारण जे सर्व। आता तुज असे कर्तव्य। वरदशंकर व्रत




शुद्ध ॥६१॥ विष्णू म्हणे कसे करावे। शिव सांगे त्याला स्वभावे। शुद्धभावे करावया हवे। शिवपूजन व्रतदिनी ॥६२॥ मंडप सुंदर उभारावा। त्यामधी चौरंग ठेवावा। त्यावरी रत्नांकित ठेवावा। कलश वरी ताम्हन ॥६३॥ त्यात तांदुळावरी अष्टदल। कुंकुमरेखित सोज्वळ। त्यावरी स्थापावी निर्मळ। शिवमूर्ती धातूची ॥६४॥ सुवर्ण ताम्र वा रजत। जैसे असे सामर्थ्य। अथवा पूगीफल प्रशस्त। मृत्तिकालिंगही ॥६५॥ मूर्ती असावी अथवा लिंग। शुद्ध आणि अव्यंग। षोडशोपचारे यथासांग। पूजन त्याचे करावे ॥६६॥ गव्हाच्या चूर्णात शर्करेते। घोळून मृदू तया घृते। पक्क भाजले घ्यावे पुरते। नैवेद्यासी हविष्यान्न ॥६७॥ करावे त्याचे तीन भाग। एक शंकरासी अर्पण। द्वितीय भागासी ब्राह्मण। योग्य सेवन करावा

॥६८॥ तृतीय भाग स्वकीयांसहित। असती जे निमंत्रित। वाटूनी द्यावा तीर्थसंगत। अभिषेकजलतीर्थ ते ॥६९॥ चारी वर्णाचे जे जन। प्रसाद त्यानी करावा सेवन। दासदासी आप्तजन जाण। सर्वांतेही ग्राह्य असे ॥७०॥ मज सर्व समान भावे। प्रिय असती भक्तिभावे। म्हणूनी कोणासही न वर्जावे। प्रसाद दानीं जाण पां ॥७१॥ शिववचन ऐकुनी। विष्णु म्हणे आनंद पावुनी। हे व्रत मी आचरूनी। धन्य होईन निश्चये ॥७२॥ परी एकार्णवी सृष्टी बुडाली। येथे गहू कोठे साळी। स्थान मंडपादि या काळी। लभ्य नाही मजलागी ॥७३॥ कैसे करू तव पूजन। शिव म्हणे न होई विषण्ण। जळ केवळ करी अर्पण। संकल्प मनी दृढ धरी ॥७४॥ अरे ऐक माझे वचन। भक्तिभाव शुद्ध पूर्ण। असता जरी निर्मळ मन। केवळ




जलही पुरेसे ॥७५॥ जलधारेने मज पुजावे। तरी सर्व मनोरथ पुरावे। हे मी शिव कल्याणभावे। वचन देतो भक्तांसी ॥७६॥ बोलुनी ऐसे उमारमण। सदाशिव झाला अंतर्धान। विष्णू मनी करूनी नमन। जलपूजने अर्चीतसे ॥७७॥ चिंता उपजे चित्ती परी। कथाकथन कोण करी। कथा पडता श्रवणविवरी। व्रत सांगता घडेल ॥७८॥ तोच कमलासन प्रगटला। चार वदने आली त्याला। चारी वेदांचा जन्म जाहला। कथा प्रगटल्या स्वयंभू ॥७९॥ कथा विष्णूने केल्या श्रवण। नैवेद्य तीर्थप्रसाद दान। सर्वही एकच जळपूर्ण। दिधले स्वये सेवियले ॥८०॥ वरदशंकर होऊनी प्रसन्न। विष्णूसी देई सुदर्शन। चक्र तेजस्वी अतितीक्ष्ण। दैत्य घातानिमित्ते ॥८१॥ म्हणे दैत्य जे पीडिती। तुवां मारावें तयांप्रती। या सुदर्शनाची दीप्ती। त्रैलोक्याते

प्रकाशावी ॥८२॥ मम व्रतप्रभावे करून। तू पूज्य होशील जाण। भुक्ति मुक्ति यांचे दान। जनांलागी देशील ॥८३॥ यापुढती तुजला मजला। भेद नाही राहिला। तू पाळावे सृष्टीला। विधाता करी निर्माण ॥८४॥ मीच तुझिया शरीरांत। आता निजतेजे होतो प्रविष्ट। तेणे दुष्टांना तू नष्ट। कराया होशील समर्थ ॥८५॥ वैकुंठ सर्व वैभव पूर्ण। अतुलनीय दिव्य स्थान। तेच देतो तुला निकेतन। परमगती त्रैलोक्यी ॥८६॥ ऐसे म्हणुनी शंकराने। विष्णूचिया अंगी तेजाने। केले गूढशक्तीने प्रवेशणे। विष्णू दिव्य दिसतसे ॥८७॥ हाती धरूनी सुदर्शन। मधुकैटभांते आव्हान करून। हातपाय मस्तके तोडून। नष्ट केले दोघांते ॥८८॥ त्यांचिया अंगमेदापासुनी। पृथ्वी बनली मृदु मेदिनी। पर्वत कठीण अस्थींनी। बनले पुढती तयांचे ॥८९॥




कार्तिकिय सांगती अगस्त्यांते। ब्रह्मा विष्णू करूनी व्रताते। धन्य पूर्वी जाहले होते। कृतकर्तव्य शिवकृपे ॥९०॥ त्वांही ऐसे व्रत करावे। तेणे विश्वनाथासी पावावे। ज्यानी हे व्रत वाचावे। आणि करावे ते धन्य ॥९१॥ त्यांचिया कुळांचा उद्धार। होईल हे साचार। कार्तिकिय जे धर्माधार। सांगताती मुनीते ॥९२॥ पुराण कथा ती संस्कृत। दिवाकर घैसास अनुवादित। मराठी ओवीरचनेत। प्रथम अध्याय गोड हा ॥९३॥ पुढती द्वितीय अध्यायात। आणिकही कथा सांगत। शौनकादिकांसी सूत। अगस्त्य उपाख्यानीं ॥९४॥

॥प्रथम अध्याय समाप्त॥

## ॥अध्याय दुसरा॥

सूत सांगती शौनकांते। अगस्त्य म्हणती कर्तिकियाते। ऐकता अजुनी मन्मनाते। उत्सुकता अधिक लागली ॥१॥ आणिक वाटेल समाधान। ऐसे करावे कथन। कार्तिकिय म्हणे तपोधन। मुनिवर्य ऐका हो ॥२॥ ज्यासी नसेल संतान। म्हणुनी जो असमाधान। तेणे ह्या व्रताचे आचरण। मनोभावे करावे ॥३॥ सृष्टी उत्पन्न करूनी। पूर्वी ब्रह्मा अवलोकुनी। पाहता ती स्थिर नसुनी। नष्ट होता दिसतसे ॥४॥ जी जी घडवावी आकृती। ती ती विरे क्षणान्ती। कालावधी नसे निश्चिती। टिकेना वस्तू एकही ॥५॥ म्हणुनी विष्णूची प्रार्थना। केली मनी धरूनी कामना। विष्णु प्रसन्न चतुरानना। होवोनि सांगे मनोगत ॥६॥ तुवा वरदशंकरव्रताचा। संकल्प केलासे साचा। परी



बोल तो पूर्वीचा। अपूर्णचि राहिला ॥७॥ मज एवढे ऐश्वर्य प्राप्त। कारण ते वरदव्रत। तूही पूर्वी झालासी मुक्त। दुःखापासोनी ॥८॥ ऐकुनी वैकुंठपतीचे वचन। विधात्यासी जाहले स्मरण। तेणे वरद-शंकर व्रत पूर्ण। आचरिले सत्वर ॥९॥ शंकर होवोनी प्रगट। म्हणे ब्रह्मदेवासी स्पष्ट। नम्र होउनी मागत। तरी ते देईन ॥१०॥ ब्रह्मा म्हणे शंभुदेवा। ऐसा वर मज द्यावा। प्रजेचा प्रसर वाढावा। स्थिरत्व यावे सृष्टीसी ॥११॥ भूलोकींचे जे जीव। तव चरणी ठेवुनी भाव। पूजन करितील तर। कामना त्यांच्या पुरवाव्या ॥१२॥ वरदशंकर म्हणे पुढती। व्रतप्रभावे प्रजास्थिती। उत्तम राहील ऐशी शक्ती। तव कार्यास राहील ॥१३॥ जे मानव हे कल्याणप्रद। व्रत करतील सानंद। तयांना संतती प्राप्त। होईल हे मद्वचन ॥१४॥ वंध्या राहील गरोदर।

गर्भ होईल सचेत स्थिर। अपत्य लाभेल मनोहर। व्रत करिता स्त्रियांनी ॥१५॥ एकापत्य प्राप्तीनंतर। जरी पुत्र होईना तर। वरदव्रताने साचार। फिरुनी पुत्र लाभेल ॥१६॥ विद्याभ्यासी मती मंद। व्रत करिती होतील गुणवंत। निर्धन होतील लक्ष्मीवंत। रणी वीर विजयीही ॥१७॥ कलियुगी मानवांसी। व्रत होईल कल्याणासी। प्राप्त करितील इच्छितासी। नसो संशय तदर्थे ॥१८॥ कार्तिकेय म्हणे अगस्त्यांते। ऐसे बोलुनी विरिंचीते। शंभू जाती स्वस्थानाते। ब्रह्मा पावे संतोष ॥१९॥ आणिकही कथा एक। माहात्म्य व्रताचे बोधक। सांगतो मुनिवर्या क्षणैक। अवधान देईजे ॥२०॥ पूर्वकाली विश्रवासुत। कुबेर नामे विख्यात। तेणे ब्रह्मदेवासी तुष्ट। केले दीर्घतपाने ॥२१॥ लंकेचे राज्य तयाते। विरिंचीने दिले होते। पुष्पक




नामे विमानाते। कुबेरासी दिधले हो ॥२२॥ त्या वरदानयोगे कुबेर। ऐश्वर्यवंत शोभे खरोखर। लोकहितासी राही तत्पर। कीर्तिमंत त्रैलोक्यी ॥२३॥ मत्सर तयाचा वाटुनी। दैत्य गेले संतापुनी। रावणासी सांगती जाऊनी। पहा कुबेर म्हणताती ॥२४॥ तुझा तो भाऊ सावत्र। नाव गाजतसे सर्वत्र। ऐश्वर्यासी असे का पात्र। करी विचार गांभीर्ये ॥२५॥ धिक्कार असो दैत्यकुळाते। वैभव मिळाले कुबेराते। हे रावणा, आम्हा वाटते। पतन व्हावे तयाचे ॥२६॥ तो दरिद्री व्हावा पुढे। ऐसे मनी आहे गाढे। रावणा आता करी एवढे। तप की ऐसे होईल ॥२७॥ ऐश्वर्य मिळेल तुजलागी। कुबेर होईल दुर्भागी। ऐकता दैत्यांची सांगी। रावण म्हणे तयांते ॥२८॥ कुबेर आहे भाऊ माझा। त्याविषयी मज सदाचा। भाव असे आदराचा। परी मी तयाहुनी

॥२९॥ अधिक घोर तप करीन। वैभव आगळे मिळवीन। ऐसे देवोनी अभिवचन। रावण तपार्थ निघाला ॥३०॥ गोकर्ण क्षेत्रात जाऊन। तपश्चर्या करी रावण। परी सिद्धी-प्राप्तींत न्यून। उरे काही तयाचे ॥३१॥ निर्वाणीचा उपाय म्हणुनी। शिर अर्पिले तेणे छेदुनी। देव भयभीत झाले गगनी। घोर तपःप्रभावे ॥३२॥ दशसहस्र वर्ष अवधी। रावण योगाभ्यास साधी। धूर्जटीचिया प्रसादासाठी। अविरत साधन ॥३३॥ नारद त्रिखंडसंचारी। रावणासमीप आली स्वारी। रावण त्यांचे स्वागत करी। म्हणे धन्य जाहलो ॥३४॥ समचित्त साधूंचे दर्शन। दुर्लभ म्हणती सर्वजन। तो लाभ मजला होऊन। दिवस ठरला मंगल ॥३५॥ तप करीतसे दीर्घकाल। प्रसन्न व्हावा महाकाल। त्रैलोक्याचे मज लाभेल। राज्य मज ही आशा




॥३६॥ परी यश न मिळे अजुनी। शंकर अजुनी अंतर्ध्यानी। प्रत्यक्ष न दिसती लोचनी। काय उपाय त्यासाठी ॥३७॥ नारद गुरु श्रेष्ठ लोकी। म्हणे दीर्घतपे तो पिनाकी। प्रसन्न होतो ऐसे ठाऊकी। त्रिखंडात सर्वांते ॥३८॥ तपाचरण योगाभ्यास। यांचे फार सायास। परी दया न ये शिवास। एक युक्ती परि असे ॥३९॥ वरदशंकर व्रत करावे। आणि शिवासी प्राप्त व्हावे। त्यासी प्रिय असे स्वभावे। व्रत ऐसे सांगतो ॥४०॥ रावण पुसे नारदाला। व्रत विवरण सांगा मजला। नारद सांगे तयाला। व्रतविधी तेधवा ॥४१॥ शुद्ध स्थानी सुशोभित। चौरंगावरी पूर्णपात्र। रंगावलीने अष्टपत्र। कमलाकृती काढावी ॥४२॥ कलशावरी पंचपल्लवयुक्त। आत रत्ने पाच प्रशास्त। कलश सोज्वळ स्थापित। मूर्ती सोमराजाची ॥४३॥ उत्तर दिशेला

सोमराजासी। आठ दिशांसी दिक्पालांसी। दक्षिणेसी लक्ष्मी-विष्णूसी। करावे स्थापन ॥४४॥ सर्व प्रतीके पूगीफलांची। मूर्ती असावी उमाशंकराची। सुपारीवरी नंदीची। सन्मुख करी स्थापना ॥४५॥ वामभागी जया देवीची। स्थापना करावी साची। पूजा या पंचदश देवतांची। प्रदोषसमयी करावी ॥४६॥ गहूचूर्ण शर्करायुक्त। करावे ते घृतयुक्त। नैवेद्याचे त्रिभाग उचित। करावे ते समान ॥४७॥ एक द्यावा विप्रांसी। दुसरा द्यावा निमंत्रितांसी। एक भाग निज-आप्तांसी। स्वये भक्षुनी वाटावा ॥४८॥ व्रताचे या करिता आचरण। प्रसन्न होईल पंचानन। सांगती नारद व्रत पूर्ण। रावण मनी तोषला ॥४९॥ नारद जाती तेथुनी। रावणे व्रत ते करूनी। प्रसन्न शिव होवोनी। वर दिधले तयाते ॥५०॥ मानवांपेक्षां इतरांस। रावण





अजिंक्य लोकांस। शिववरदाने तयास। सामर्थ्य हे मिळाले ॥५१॥ यक्ष राक्षस देवता। यांवरी रावणाची सत्ता। ऐसा वर तो शिव दाता। देता जाहला तेधवा ॥५२॥ वरदव्रताचेनि प्रभावे। रावणासी मिळाली सर्व वैभवे। मातेसी वंदी नम्रभावे। केकसीनामे ते जननी ॥५३॥ मागुती कुबेराचिया नगरीते। रावण गेला लंकेते। पराभूत करूनी कुबेराते। परागंदा करी तया ॥५४॥ लंकानगरी पुष्पक विमान। वरदान प्रभावे जाण। त्रैलोक्य मानी त्याचे शासन। रावण झाला बलाढ्य ॥५५॥ तिकडे राज्यहीन कुबेर। भटकू लागला निराधार। मनी दुःख करी वारंवार। पूर्व कर्म निंदीतसे ॥५६॥ पुढती कालांतराने। करूनी बहुत हिंडणे। जाता जाहला योगायोगाने। कैलासपर्वती ॥५७॥ तेथे पवित्र उपवनात। बैसला तप करीत।

शंकराचे ध्यान मनात। आर्तभावे धरितसे ॥५८॥ दधीची ऋषी बहुत काले। उपवनाप्रती पातले। कुबेरासी त्यानी पाहिले। म्हणती काय ही स्थिती ॥५९॥ कुबेर भक्तिभावे प्रणिपात। करून सांगे वृत्तांत। समाचार त्यांचाही पुसत। ऋषी म्हणती तयासी ॥६०॥ गेलो होतो लंकानगरीसी। रावण करितो व्रतासी। आराधनेने वरदशंकरासी। संतुष्ट करावया ॥६१॥ सर्व वैभवे त्याला प्राप्त। वरदशंकराचे जे व्रत। तेच इष्टफलप्रद। नित्य करी लंकेश ॥६२॥ तेथुनी कैलासाते जाऊनी। येत मी परतुनी। येथे तुजला पाहूनी। तप प्रयोजन विचारले ॥६३॥ कुबेर सांगे दधीचीला। ब्रह्मदेवे मज वर दिला। म्हणुनी होते वैभव मला। लंकासत्ता लाभली ॥६४॥ परी रावणाने येऊन। लंका घेतली जिंकुन। नेले माझे पुष्पक विमान। कैसा जय त्या मिळाला?




॥६५॥ ऋषी सांगती गोकर्णक्षेत्री। रावणे साधना केली पुढती। वरदशंकर व्रताप्रती। आचरिले शिवभक्ते ॥६६॥ तेणे त्यावरी शिवशंकर। प्रसन्न झाला उमावर। दिधला त्यासी ऐसा वर। जेणे विजयी जाहला ॥६७॥ सांगुनी ऋषी दधीची। जिज्ञासा जाणुनी कुबेराची। माहिती देती वरदव्रताची। शिवपूजेची समग्र ॥६८॥ कुबेरही करी व्रत। शंकर त्यातें दर्शन देत। म्हणे कुबेरा तुझे हित। करावयाते सज्ज मी ॥६९॥ अलका नगरी मी निर्मिली। उत्तर दिशेसी असे वसली। तेथे सर्व वैभवे भरलेली। राज्य तेथे तू करी ॥७०॥ अद्यप्रभृती यक्षांचा। आणि अधिपती तू धनाचा। देवांचिया नवनिधींचा। रक्षणकर्ता तू व्हावे ॥७१॥ लंकेहुनी अलका नगरी। अधिक वैभवशाली खरी। दानव राक्षस तुजवरी। कोणी नच वरिष्ठ

॥७२॥ रावणाहुनी श्रेयस्कर। सत्ता वैभव खरोखर। देऊनिया त्याते शंकर। अंतर्धान पावती ॥७३॥ कार्तिकेय म्हणे मुनीते। वरदशंकर व्रते त्याते। दिव्य लोकींचे सौख्य मोठे। चिरंतन लाभले ॥७४॥ जो जो करील व्रताचरण। माहात्म्यही करील पठण। त्याचे मनोरथ सर्व पूर्ण। सुख भोगील पुण्याने ॥७५॥ राज्यहीनासी राज्यप्राप्ती। किंबहुना जे इष्ट चित्ती। त्याची होईल प्राप्ती। नि:संशय ऋषिवर्या ॥७६॥ भविष्योत्तर पुराणांत। वरदशंकर व्रत वर्णित। मराठी ओवीरूप रचीत। दिवाकर कवि प्रेमे ॥७७॥ कुबेर रावण कथाभाग। द्वितीयाध्यायी असे चांग। वर्णन केले हेच भाग्य। शिवकृपा जाहली ॥७८॥ इति श्री भविष्योत्तरपुराणी। वरदशंकरव्रतकथनीं। सूतशौनक संवादाख्यानीं। द्वितीयाध्याय गोड हा ॥७९॥ ॥ द्वितीय अध्याय समाप्त ॥




## ॥ अध्याय तिसरा ॥

सूत सांगती शौनकादिकांसी। जो जो करील सद्भावेसी। वरदशंकराचिया व्रतासी। संततिसंपदा पावेल ॥१॥ शत वर्षे लाभेल जीवन। ऐहिक सुखी न पडे न्यून। कलिकल्मषाचा नाश होऊन। प्राप्त होई शिवलोक ॥२॥ श्रवण करावी कथा आणिक। कलियुगी हे व्रत सुख। निश्चित देणारे अलौकिक। माहात्म्यही तयाचे ॥३॥ अवंती नगरीमाजी पूर्वी। धर्मे पालन करी उर्वी। मानिला श्रेष्ठ न्यायी निगर्वी। जय नामक नृपाळ ॥४॥ भक्तियुक्त अंतःकरण। तत्परतेने करी प्रजापालन। शूर प्रतापी उदारमन। दानी यज्ञकर्ता तो ॥५॥ ब्राह्मणांचा विद्येचा। कलेचा आरि

सद्गुणांचा। आदर करी सुजनांचा। बुद्धिमान सुज्ञ तो ॥६॥ कालेकरूनी पूर्वसंचित। भोक्तृत्व उपस्थित। अंधत्व येऊनी खेद प्राप्त। फार जाहला तयासी ॥७॥ पौण्ड्रक राज्याचा अधीपती। त्याची जाणुनी दुःस्थिती। चालुनी आला नगर अवंती। पादाक्रांत करावया ॥८॥ राजा 'जय' करी नावाचा। अंधपणे पराधीन साचा। मार्ग धरी अरण्याचा। राज्यहीन होवोनी ॥९॥ वारंवार खंत करीत। संगे भार्याही दुःखी जात। वनी निर्जनी तिला म्हणत। काय करू कळेना ॥१०॥ दुर्गती भोगावयाची काय। न चले दैवासी उपाय। यापेक्षां मरण वाटे श्रेय। काय करू जगुनी मी ॥११॥ उद्वेग वाटे फार चित्ता। त्यासी बोले पतिव्रता। कर्मार्जित दुःखे काय मानितां। निराशा ही मनाने ॥१२॥




गतजन्मीचे कर्म घडले। तेणे आज दैन्य आले। परी या जन्मी पुण्य केले। पुढती सुख लाभेल ॥१३॥ समीप दिसतसे सुंदर। उपवनी आश्रम मनोहर। फुले फळे वृक्षवेलींवर। पक्षी करिती कूजन ॥१४॥ राहावे तेथे आपण। करीत नित्य ईशचिंतन। उर्वरित आपले जीवन। शिवस्मरणी घालवू ॥१५॥ मानुनी भार्येचिया वचना। राजा तिजसंगे त्या वना। जाता जाहला दीनवाणा। आश्रयार्थ दुर्दैवी ॥१६॥ तेथे होता जो आश्रम। वामदेव मुनींचे ते धाम। प्रवेश करिता नृप श्रम। शीतलवायूने विसरला ॥१७॥ विश्राम वाटला मनाला। निवांत आश्रम स्थानाला। भार्या म्हणे निजनाथाला। हात धरूनी नेतसे ॥१८॥ नाथ, येथे ऋषी महान। वामदेव असती पुण्यवान। करावे तयाला

वंदन। आशीर्वाद देतील ॥१९॥ रक्षणार्थ मुनीतें विनवुनी। नमस्कार केला उभयतांनी। वामदेवांनी त्यांते पाहुनी। कुशल पुसले तेधवा ॥२०॥ हे नृपा काय जाहले। दैन्य अंधत्व कैसे आले। भार्येसह का वन धरिले। खेद आता न करी ॥२१॥ राजा सांगे अंधत्वाने। पराधीन झालो शत्रूने। राज्य जिंकिले पौण्ड्रकाने। अवंती गेली त्याहाती ॥२२॥ वामदेव म्हणती तयाला। जो पावतो निजभक्ताला। तया आशुतोष शिवाला। शरण जाई सर्वथा ॥२३॥ नमःशिवाय हा पंचाक्षर। मंत्र जपावा निरंतर। मनी ध्यावा उमावर। सदाशिव दीनत्वे ॥२४॥ वामदेवे उपदेशिता। मंत्र जपती उभयता। सात दिन शांत चित्ता। करुनिया भक्तीने ॥२५॥ सातव्या रात्री स्वप्नांत। वृद्ध ब्राह्मण



देई दृष्टांत। राजेंद्रा उठ उठ म्हणत। हे घे पुस्तक व्रताचे ॥२६॥ ऐसे म्हणुनी जयनृपासी। पुस्तक देऊनी क्षणासरसी। अंतर्धान पावला स्वप्नदेशी। विप्ररूप शंकर ॥२७॥ नृप जाहला जागृत। जवळी पुस्तक दिव्य स्पर्शत। बैसला नवल करित। क्षणी आठवे दृष्टांत ॥२८॥ हाती धरूनी ते पुस्तक। वंदन करी लावुनी मस्तक। भार्येसी उठवूनी क्षणैक। दोघे नवल करिताती ॥२९॥ वामदेवांसी जाऊनी। सांगती काय घडले दोन्ही। स्वप्नात पुस्तक लाभले म्हणुनी। आनंद तया जाहला ॥३०॥ वामदेव म्हणती नृपाला। विषमकाळ तव संपला। वरदशंकर व्रत तुजला। स्वये दिले ईश्वरे ॥३१॥ आता करावे पुस्तकानुसार। व्रताचरण सदाचार। ऐसे म्हणुनी ते मुनिवर। व्रत सांगती यथाविधी

॥३२॥ भार्येचिया सहाय्याने। व्रत केले अंध नृपाने। प्रसाद घेतला श्रद्धेने। कथा श्रवण करोनी ॥३३॥ शंकर जाहला प्रसन्न। नृप नेत्रांसी स्पर्श करून। करी नूतन दृष्टी प्रदान। म्हणे माग वरदान ॥३४॥ नेत्र लाभता नृपाला। प्रथम दिसला शिवभोळा। सोत्कंठ शब्दे स्तवी त्याला। भार्येसह वंदुनी ॥३५॥ शिवापाशी मागे भक्ती। नित्य त्याचिया चरणाप्रती। शंकर तेणे प्रसन्न अती। सांगे राजासी हिताचे ॥३६॥ माझिया प्रसादेकरून। अवंतीचे राज्य मिळून। पुत्रपौत्र वैभवे भोगून। दीर्घकाळ राहशील ॥३७॥ नंतर येशील कैलासाला। ऐसे म्हणुनी शिवभोळा। वामदेवाते देऊनी दर्शनाला। अंतर्हित जाहला ॥३८॥ जाण्यापूर्वी देई वचन। जो करील व्रताचरण। भुक्तिमुक्ति त्यासी मिळून।




शिवरूप होईल ॥३९॥ कलियुगामाजी जन। करितील जरी व्रताचरण। वरदशंकर नामे जाण। तरी धन्य होतील ॥४०॥ संकट परिहार कल्याणलाभ। सर्व लक्षणे होतील शुभ। पठणश्रवणे परम भोग। सुख प्राप्ती घडेल ॥४१॥ शिवाज्ञेने जय नृप। भार्येसहित तो निष्पाप। नम्र झाला वामदेवासमीप। घेऊनी निरोप जातसे ॥४२॥ प्रचंड सेना गजतुरगांची। नगरी घेतली अवंतीची। दाणादाण करुनी शत्रूंची। राज्य मिळविले आपुले ॥४३॥ प्रतिमास करी तेच व्रत। तेणे अंती त्यासी प्राप्त। शिवलोकी परमपद। सूत कथा सांगती ॥४४॥ सत्यशिव व्रत जाणावे। वरदशंकर व्रत म्हणावे। कलियुगी तारक व्हावे। म्हणुनी दिले शिवाने ॥४५॥ संकटहरण सुखकारण। ऐसे हे शिवपूजन।

माहात्म्य करिता श्रवण। परमपुण्य लाभतसे ॥४६॥ घैसास विप्रकुलसंजात। दिवाकर कवी अनंतसुत। शिवलोकांतुनी सांप्रत। भक्तिकार्यार्थ जन्मला ॥४७॥ शिवकृपा शिवगण दीक्षित। सनत्कुमार अनुमोदित। करी ग्रंथरचना प्रेरित। सद्गुरुवाक्ये पावन ॥४८॥

॥तृतीय अध्याय समाप्त॥

॥इति श्रीवरदशंकर व्रत-कथा व माहात्म्य समाप्त॥

॥ॐ नमःशिवाय॥




## ॥ श्रीशंकराची आरती ॥

लवथवती विक्राळा ब्रह्मांडीं माळा॥ विषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा॥ लावण्यसुंदर मस्तकीं बाळा॥ तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझूळां ॥१॥ जय देव जय देव श्रीशंकरा॥ आरती ओवाळूं तुज कर्पुरगौरा जय देव जय देव ॥ध्रु०॥ कर्पुरगौरा भोळा नयनीं विशाळा॥ अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा॥ विभूतीचें उधळण शितिकंठ नीळा॥ ऐसा शंकर शोभे उमावेल्हाळा ॥२॥ जय देव जय देव श्रीशंकरा॥ आरती ओवाळूं तुज कर्पुरगौरा जय देव जय देव॥ध्रु०॥ देवीं दैत्यीं सागरमंथन पैं केलें॥ त्यामाजीं अवचित हाळाहळ उठिलें। तें त्वां असुरपणें प्राशन केलें॥ नीलकंठ नाम प्रसिद्ध झालें ॥३॥ जय देव जय देव श्रीशंकरा॥ आरती ओवाळूं तुज कर्पुरगौरा जय देव जय देव॥ध्रु०॥ व्याघ्रांबर फणिवरधर सुंदर मदनारी॥ पंचानन मनमोहन मुनिजनसुखकारी॥ शतकोटींचें बीज वाचे उच्चारी॥ रघुकुळटिळक रामदासा अंतरीं ॥४॥ जय देव जय देव श्रीशंकरा॥ आरती ओवाळूं तुज कर्पुरगौरा जय देव जय देव॥ध्रु०॥

# ॥ शिवपञ्चाक्षरस्तोत्रम् ॥

श्रीगणेशाय नमः॥ नागेंद्रहाराय त्रिलोचनाय भस्मांगरागाय महेश्वराय। नित्याय शुद्धाय दिगंबराय तस्मै 'न' कराय नमः शिवाय ॥१॥ मंदाकिनीसलिलचंदनचर्चिताय नंदीश्वरप्रमथनाथमहेश्वराय। मंदारमुख्यबहुपुष्पसुपूजिताय। तस्मै 'म' काराय नमः शिवाय ॥२॥ शिवाय गौरीवदनाब्जवृंदसूर्याय दक्षाध्वरनाशकाय। श्रीनीलकण्ठाय वृषध्वजाय तस्मै 'शि' काराय नमः शिवाय ॥३॥ वसिष्ठकुंभोद्भव - गौतमार्य - मुनींद्र देवार्चितशेखराय। चन्द्रार्कवैश्वानरलोचनाय तस्मै 'व' काराय नमः शिवाय ॥४॥ यक्षस्वरूपाय जटाधराय पिनाकहस्ताय सनातनाय। दिव्याय देवाय दिगंबराय तस्मै 'य' काराय नमः शिवाय ॥५॥ पञ्चाक्षरमिदं पुण्यं यः पठेत् शिवसन्निधौ। शिवलोकमवाप्नोति शिवेन सह मोदते ॥६॥

॥ इति श्रीमच्छंकराचार्यविरचितं शिवपञ्चाक्षरस्तोत्रम् संपूर्णम्॥

॥ श्रीशंकरायार्पणमस्तु॥

**धार्मिक प्रकाशन संस्थेची लोकप्रिय प्रकाशने**




धार्मिक प्रकाशन संस्था, मुंबई

- **संपूर्ण चातुर्मास** संपादक : का.अ.जोशी
- **संपूर्ण सुलभ ज्ञानेश्वरी** संपादक : का.अ.जोशी
- **श्री एकनाथी भागवत कथासार** एकनाथी भागवताचा सुगम सारांश
- **श्रीभावार्थ रामायण कथासार** (श्रीसंत एकनाथ महाराजकृत)
- **सार्थ श्रीज्ञानेश्वरी** संपादक : का. अ. जोशी
- **श्री गुरुचरित्र** साधी बांधणी — सरस्वती गंगाधर कृत
- **श्री भक्तविजय पोथी** श्री महिपती विरचित
- **श्री नासिकेत पोथी**
- **श्रीशिवलीलामृत कथासारासहित**
- **श्री हरिविजय पोथी** पंडितकवि श्रीधर विरचित
- **श्री नवनाथ भक्तिसार** (धुंडिसुत श्री. मालुकवि विरचित)
- **श्री देवी माहात्म्य** रामबाबा वर्णेकर
- **श्री मल्हारी माहात्म्य पोथी** डेमी साईज
- **श्री नवनाथ कथासार** जितेंद्र ठाकूर
- **श्री हरिविजय कथासार**
- **श्री भक्तविजय कथासार**

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni Galleria CHS., Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai - 400043.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers

hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com